उपस्थिती होती. काम करत आहे. पतसंस्थेत ५ कोटी टक्के लाभांश देण्यात आला आहे. असा विश्वास त्यांना यावेळी व्यक्त

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान



तासगाव : ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानप्रसंगी अॅड. कॅप्टन मधुकर पांडुरंग शिंदे व मान्यवर.

**तासगाव / प्रतिनिधी**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव येथे जागतिक स्मृतिभ्रंश जागरूकता दिन साजरा केला. तासगाव परिसरातील ज्येष्ठ नागरिकांना आवाहन करून महाविद्यालयात निमंत्रित केले. त्यांना गुलाबपुष्प व चहा, पान देऊन त्यांचा सन्मान केला. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अॅड. कॅप्टन मधुकर पांडुरंग शिंदे उपस्थित होते.

शिंदे यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. पोलीस स्टेशनच्यावतीने राबवण्यात येणाऱ्या सुरक्षाकवच योजनेची माहिती दिली. एम. बी. पवार, निवृत्ती धनवडे, ए. एन. पाटील, जयवंत पाटील, ज्येष्ठ नागरिकांनी मनोगतामधून उर्वरित आयुष्य आनंदात घालविण्यासाठी जीवन पद्धतीत बदल करण्याविषयी सांगितले.

प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे म्हणाले, ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे फार मोठे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या ज्ञानाचा फायदा करून घेणे आवश्यक आहे. विसराळूपणा आणि स्मृतिभ्रंश यामध्ये फरक असल्याचे त्यांनी सांगितले. स्मृतिभ्रंश याविषयी समाजात जागृती निर्माण व्हावी, ज्येष्ठ नागरिकांना सन्मान मिळावा, असे सांगितले.

प्रास्ताविक जे. ए. यादव, आभार आर. बी. मानकर यांनी मानले. सूत्रसंचालन अण्णासाहेब बागल यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. के. एस. पाटील, ज्येष्ठ नागरिक व महाविद्यालयातील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.